पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मातंवि/१२/कावि/१४४/२०१६
दिनांक: २६/०५/२०१६

विषय : “स्वच्छ भारत अभियान” अंतर्गत "Theme Based Cleanliness" बाबत....

संदर्भ : श्री. प्रवीण प्रकाश, भा.प्र.से ,संयुक्त सचिव व मिशन निदेशक (एस.बी.एम), शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्रमांक डीओ क्र.SB/SBM/50/2016 दिनांक ११/५/२०१६

परिपत्रक,

स्वच्छ भारत अभियान” अंतर्गत प्राप्त संदर्भीय ई-मेल अन्वये “स्वच्छ भारत अभियान” चे “Theme Based Cleanliness” दिनांक १६/५/२०१६ ते ३१/५/२०१६ या कालावधीत **“शासकीय कार्यालये / इमारत आणि इतर सार्वजनिक संस्था (Government Offices/ Buildings and other Public Institutions) “** येथे विशेष स्वच्छता अभियान गाबविणे बाबतचा तपशील व इतर महत्वाचे मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करणेत आली आहे. सदर ई-मेल दिनांक १३/५/२०१६ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या ई-मेल आई-डी वरून आपल्याला फॉरवर्ड करणेत आलेले आहे. त्या अंतर्गत खालील बाबी नमुद करणेत आलेल्या आहेत:

- स्वच्छतेची मोहिम श्रमदानातून हाती घेण्यापूर्वी सामुहिक स्वच्छता शपथ घ्यावी.
- आपले कार्यालयातील /विभागात स्वच्छतेची तपासणी करावी तसेच तेथे स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन होत नाही याची खात्री करावी.
- आपले कार्यालयातील /विभागात व आसपासचे भागात राडारोडा साफ करणेकामी विशेष स्वच्छता अभियान राबविणेत यावे.
- आपले कार्यालयातील /विभागात सर्व शौचालय स्वच्छ व सुस्थितीत ठेवणेकामी विशेष प्रयत्न करावेत. त्या अंतर्गत शौचालयांमध्ये सर्व Toilet Seats, Urinals व Wash Basins सुस्थितीत कार्यरत ठेवावे. तेथील नळ, फ्लश व जल:निसारण व्यवस्था सुस्थितीत असलेची खात्री करावी.
- आपले कार्यालयातील /विभागामध्ये ईमारतीची गच्ची, पाण्याची टाकी, fire tank व व आसपासचे भागाची स्वच्छता करणे, मोडकळीस आलेले फर्निचर, उपकरणे इ. यांची शक्य असलेस दुरुस्ती करावी तसेच अनावश्यक पडून असलेले भंगार साहित्य भांडार विभागात जमा करावे.

वरील स्वच्छतेच्या मोहिमे करिता मोहिमे आधी, मोहिमे दरम्यान व मोहिमे नंतर असे छायाचित्रण करून ते योग्य माहिती-तपशील सह स्वच्छ भारत अभियानाच्या https://swachhbharat.mygov.in या संकेतस्थळावर आपलेमार्फत अपलोडं करावे, ट्विटर वर #MyCleanIndia hash tag वापरून अपलोड करावे किंवा फेसबुक वर Swachh Bharat Mission - Urban वर पोस्ट करणे. तसेच सदरची बातमी स्थानिक वृत्तपत्रात व वृत्तवाहिनीत प्रसिद्ध होणेकामी विशेष प्रयत्न करावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) राबविण्यात येत असून सदर अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड शहराचे सर्वेक्षण झालेले असून सदर सर्वेक्षणात देशात ९वा क्रमांक व महाराष्ट्र राज्यात १ला क्रमांक आलेला आहे. सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी **“स्वच्छ भारत अभियान” अंतर्गत "Theme Based Cleanliness"** समाधानकारकरित्या हाती घेणेचे दृष्टीने आपण आवश्यक ती दक्षता घ्यावी आपल्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली आपले महानगरपालिकेतील सर्व विभाग व क्षेत्रिय कार्यालयांनी उत्तम कामगिरी करावी.

तसेच, स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सर्व क्षेत्रिय अधिकारी व विभाग प्रमुखांनी सह आयुक्त तथा शहर अभियान संचालक यांचेशी आपआपसांत समन्वय साधून तसेच आरोग्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करून स्वच्छतेचे कामकाज पूर्ण करून घ्यावे. त्यानुसार, "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत कालावधीत **"शासकीय कार्यालये / इमारत आणि इतर सार्वजनिक संस्था (Government Offices/ Buildings and other Public Institutions)"** येथे विशेष स्वच्छता अभियान" प्रभावीपणे राबविणेत यावे व शासनाने मागविलेले अहवाल वेळेत पाठविणेची दक्षता घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रति,

१) सह आयुक्त तथा शहर अभियान संचालक

२) क्षेत्रिय अधिकारी (सर्व)

महापालिकेतील सर्व विभागात वरील "Theme Based Cleanliness" हाती घेणेत यावे तसेच स्वच्छता कार्यक्रमाची योग्य नोंद ठेवणेत यावी. त्या बाबतचा अहवाल संबंधित क्षेत्रीय कार्यालय, सह आयुक्त तथा शहर अभियान संचालक व माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे hard copy व soft copy (Microsoft Word File) स्वरुपात पाठविणेची दक्षता घ्यावी व त्याचे संपूर्ण रेकॉर्ड आपले विभागात तपासणी करिता उपलब्ध ठेवावा.

३) आरोग्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभाग

४) सहा. आयुक्त, माहिती व जन संपर्क विभाग